# प्रेसनोट

दि.१७/१२/२०२१

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगांव कर संकलन विभागातील दोन लिपिकांवर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | वाकड पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७, १२ |
| तक्रारदार | पुरुष, वय - २४ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक – (१) प्रदीप शांताराम कोठावदे, वय - ३९ वर्षे,<br>पद - लिपिक, थेरगांव कर संकलन विभाग, ड क्षेत्रिय कार्यालय पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे.<br>(२) हैबती विठ्ठल मोरे, वय – ५१ वर्षे,<br>पद - लिपिक, थेरगांव कर संकलन विभाग, ड क्षेत्रिय कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ८,५००/- ( साडे आठ हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | लोकसेवक क्र. १ याने ५,५००/- ( साडेपाच हजार रूपये)<br>लोकसेवक क्र. २ याने ३,०००/- ( तीन हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- १६/१२/२०२१ व दिनांक १७/१२/२०२१
सापळा दिनांक :- १७/१२/२०२१
ठिकाण :- थेरगांव कर संकलन विभाग, ड क्षेत्रिय कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचा रिअल इस्टेटचा व्यवसाय असून त्यांच्या मार्फत फ्लॅट,शॉप, ऑफीस भाडयाने देणे तसेच भाडे करारनामा, खरेदीखत, मिळकत हस्तांतरण इत्यादी कामे केली जातात. तक्रारदार हे संबंधीत लोकांच्या मिळकतचे हस्तांतरण व कर पावती मधील नावाची दुरूस्ती करण्यासाठी ड क्षेत्रीय कार्यालयाच्या कर संकलन विभागातील वरिल नमुद लोकसेवकांना भेटले असता त्यांनी लाचेची मागणी केली. तशी तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची दिनांक १६/१२/२०२१ रोजी पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक यानी मिळकतचे हस्तांतरण करणे व कर पावती मधील नावाची दुरूस्ती करणे यासाठी आरोपी लोकसेवक क्रमांक १ याने ५,५००/- रूपये लाचेची मागणी केली व क्रमांक २ याने तक्रारदार यांची कामे करून देण्यासाठी ३,०००/- रूपये लाचेची मागणी केली.

आज दिनांक १७/१२/२०२१ रोजी ड क्षेत्रीय कार्यालय, थेरगांव येथील कार्यालयात आरोपी लोकसेवक क्रमांक १ याने ५,५००/- रूपये व आरोपी लोकसेवक क्रमांक २ याने ३,०००/- रूपये लाच रक्कम स्वीकारल्यावर दोघांना ताब्यात घेण्यात आले असून वाकड पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस उप अधीक्षक विजयमाला पवार तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३     ४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.